**केंद्रशासन पुरस्कृत योजनेअंतर्गत खाजगी सहभागाने (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपद्वारे) राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन निर्णय क्रमांक आयटीआय २००७/(१६२/०७ )/व्यशि-२,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ३१ डिसेंबर, २००७

**संदर्भ :** १) केंद्र शासनाचे पत्र क्र.डि.जी.ई.ॲण्ड टी/३५/(१३९६)(आयडीपी)(१)/२००७-एनपीआययु, दि.२६ मार्च २००७ व दि.१३ एप्रिल २००७

२) संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १९/सीओइ/२००७/११४,दि. १६ मे २००७

३) केंद्र शासनाचे पत्र क्र.डि.जी.ई.ॲण्ड टी/३५/(१३९६)/२/२००७-एनपीआययु, दि.२० जून २००७

४) संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १९/सीओई/२००७/१६६,दि. १८ जुलै २००७

५) केंद्र शासनाचे पत्र क्र.डि.जी.ई.ॲण्ड टी/३५/(१३९६)(एमओयु)(१)/२००७-एनपीआययु, दि.२६ सप्टेंबर २००७

६) केंद्र शासनाचे पत्र क्र.डि.जी.ई.ॲण्ड टी/३५/(१३९६)(एमओयु)(१)/२००७-एनपीआययु, दि.५ नोव्हेंबर २००७

७) केंद्र शासनाचे पत्र क्र.डि.जी.ई.ॲण्ड टी/३५/(१३९६)/गाईडलाईन्स/२००७-एन.आय.सी., दि.५/८ नोव्हेंबर २००७

८) केंद्र शासनाचे अर्धशासकीय पत्र क्र.डि.जी.ई.ॲण्ड टी/३५/(१३९६)/गाईडलाईन्स/२००७, दि.८ नोव्हेंबर २००७

९) केंद्र शासनाचे पत्र क्र.डि.जी.ई.ॲण्ड टी/३५/(१३९६)/गाईडलाईन्स/२००७-एनआयसी, दि.३ डिसेंबर २००७

१०) केंद्र शासनाचे पत्र क्र.डि.जी.ई.ॲण्ड टी/३५/(१३९६)(एमओए क्लेरिफिकेशन)/२००७/एनआयसी, दि.२८ डिसेंबर २००७

**प्रस्तावना** :- राज्यात नवनवीन उद्योग उभारले जात असून अस्तित्वात असलेल्या उद्योगाचे विस्तारीकरण झपाटयाने होत आहे. विशेष आर्थिक क्षेत्र ही संकल्पना देशात अंमलात आली असून महाराष्ट्र राज्यात सर्वात अधिक विशेष आर्थिक क्षेत्रे मंजूर झाली आहेत. त्यामुळे उद्योगधंद्यांच्या तंत्रज्ञानाशी सुसंगत कुशल मनुष्यबळाची मागणी मोठया प्रमाणात वाढत आहे. उद्योगधंद्यांच्या तंत्रज्ञानाशी सुसंगत कुशल मनुष्यबळाची गरज भागविण्याकरीता राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करावयाचा असून त्याकरीता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील गुंतवणूक वाढविणे व अस्तित्वात असलेल्या यंत्रसामुग्रीचे आधुनिकीकरण करणे आवश्यक झाले आहे.

केंद्र शासन पुरस्कृत योजनेअंतर्गत देशातील १०० व राज्यातील १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करुन सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये रुपांतर करण्याची योजना सध्या कार्यान्वित आहे. तसेच जागतिक बँक सहाय्यित व्यवसाय प्रशिक्षण सुधारणा प्रकल्पांतर्गत देशातील ४०० व राज्यातील ७५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करण्याचीही योजना सध्या सुरु आहे. वरील योजनेत निवड झालेल्या संस्थांव्यतिरिक्त देशातील उर्वरित १३९६ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप या तत्वाने टप्प्याटप्प्याने दर्जावाढ करण्याची योजना केंद्र शासनाने आखली आहे. या योजनेचा उद्देश औ.प्र.संस्थेतील प्रशिक्षणाचा दर्जा उंचावून प्रशिक्षणार्थ्यांना रोजगारक्षम करणे हा आहे. सन २००७-०८ या वर्षात पहिल्या टप्प्यात देशातील ३०० संस्थांची निवड करण्यात येणार आहे. त्यापैकी राज्यातील ५४ संस्थांचा यात समावेश करण्याचे केंद्रशासनाने निश्चित केले आहे. तसेच राज्यातील उर्वरित औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा केंद्र शासनाच्या निर्देशानुसार पुढील कालावधीत टप्प्याटप्प्याने समावेश करण्यात येईल.

केंद्र शासन पुरस्कृत खाजगी सहभागाने (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) औ.प्र.संस्थेचा दर्जा वाढ करण्याच्या योजनेतंर्गत केंद्र शासनाकडून प्रत्येक औ.प्र.संस्थेस २.५० कोटी इतकी व्याजमुक्त कर्जाऊ रक्कम उपलब्ध करण्यात येणार आहे. ही रक्कम औ.प्र.संस्थेचा दर्जा वाढविण्यासाठी वापरावयाची आहे. सदरहू योजनेच्या अंमलबजावणीकरीता गठीत करावयाच्या संस्था व्यवस्थापन समितीने उत्पन्नवाढीचे विविध कार्यक्रम राबवून प्राप्त झालेल्या उत्पन्नातून कर्जाची परतफेड करावयाची आहे. केंद्र शासनाची ही योजना राज्यात राबविण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय** :- उपरोक्त पार्श्वभूमीवर शासन आता राज्यातील खाजगी उद्योगाच्या सहभागाने (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप ) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या दर्जावाढ करावयाच्या केंद्र शासनाच्या योजनेची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. केंद्र शासनाचे पत्र क्र.डि.जी.ई.ॲण्ड टी/३५/(१३९६)/ गाईडलाईन्स/२००७-एन.आय.सी., दि.५/८ नोव्हेंबर २००७ अन्वये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार या योजनेची अंमलबजावणी करावयाची आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. या योजनेअंतर्गत निवडण्यात आलेल्या प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरीता एका उद्योगास सहयोगी उद्योग (इंडस्ट्री पार्टनर) म्हणून निवडण्यांत येईल. योजनेच्या उत्कृष्ट अंमलबजावणी करण्यासाठी सहयोगी उद्योगाचा वित्तीय सहभाग अपेक्षित आहे. सहयोगी उद्योगाचा उद्योजक / त्यांचा प्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली संस्था व्यवस्थापन समितीची ( Institute Management Committee (IMC) स्थापना करण्यात यावी. राज्य शासनाच्या सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार "औ.प्र.संस्थेच्या आय.एम.सी.ची सोसायटी" म्हणून नोंदणी करणे आवश्यक राहील.
२. संस्था व्यवस्थापन समितीला (IMC) केंद्र शासनाकडून व्याजमुक्त रु.२.५० कोटी कर्ज मिळणार आहे. याकरीता समितीने संस्था विकास आराखडा Institute Development Plan (IDP) तयार करणे आवश्यक राहील.
३. संस्था व्यवस्थापन समितीने तयार केलेले संस्था विकास आराखडे राज्यस्तरावरील योजनेची अंमलबजावणी व संनियंत्रण करणा-या राज्य सुकाणू समितीकडे सादर करण्यात यावेत. राज्य सुकाणू समिती या आराखडयाची छाननी करुन केंद्र शासनाकडे निधी वितरणाकरीता शिफारस करेल. केंद्र शासनाच्या सुचनेनुसार पहिल्या टप्प्यात ५४ संस्थांची संख्या जरी निश्चित झालेली आहे, तरी ही संख्या वाढण्याची शक्यता आहे. त्यानुसार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने ५४ व अधिकच्या ११ अशा एकूण ६५ औदयोगिक प्रशिक्षण संस्थांचे IDP राज्य सूकाणू समितीकडे सादर करावयाचे आहेत. या योजनेत समावेश करावयाच्या औदयोगिक प्रशिक्षण संस्थांची यादी सोबत जोडण्यात आली आहे.
४. या योजनेअंतर्गत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या संस्था व्यवस्थापन समिती - सोसायटीने राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडावयाचे असून केंद्र शासनाकडून संस्था विकास आराखडयानुसार रु.२.५० कोटी बिनव्याजी कर्ज सोसायटीच्या खात्यामध्ये परस्पर जमा करण्यात येईल. कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी संस्था व्यवस्थापन समिती - सोसायटीची आहे. त्यासाठी सोसायटीने उत्पन्नाचे विभिन्न स्त्रोत निर्माण करुन कर्जफेड करणे आवश्यक राहील. या कर्जाची परतफेड कर्ज प्राप्त झाल्यानंतर ११ व्या वर्षापासून पुढील २० वर्षात समान वार्षिक हप्त्यामध्ये करावयाची आहे. या योजनेच्या कर्जफेडीबाबत राज्यशासनाची कोणतीही हमी राहणार नाही.

५. या योजनेअंतर्गत उपलब्ध होणारा निधी आय.एम.सी.च्या सोसायटीच्या खात्यात जमा करणे आवश्यक राहील. या योजनेव्यतिरिक्त राज्य शासनाकडून संबंधित संस्थेस प्राप्त होणारा निधी या खात्यात जमा करता येणार नाही.

६. केंद्रशासन, राज्यशासन व सहभागी उद्योग यांच्या जबाबदा-या व भूमिका विहित केलेला सामंजस्य करार (एम.ओ.ए.)केंद्र शासनाने विहित केलेल्या प्रारुपानुसार करावयाचा आहे. त्यानुसार सहयोगी उदयोजक व संस्था व्यवस्थापन समिती यांनी सामंजस्य करार करुन शासनाकडे सादर करावयाचा आहे. तदनंतर सामंजस्य करार केंद्र शासनाकडे पाठविण्यात येईल. संचालक (प्रशिक्षण) यांनी याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

७. संस्था व्यवस्थापन समिती (IMC) ला औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे कामकाज योग्यरितीने पहाता यावे याकरीता या योजनेअंतर्गत आवश्यक ती आर्थिक व शैक्षणिक स्वायत्तता देण्यात येईल. आर्थिक व शैक्षणिक स्वायत्तता, खरेदी पध्दत, वित्तीय कार्यपध्दतीसंबंधीचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

८. संस्थेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश व शिक्षणशुल्क यावर राज्यशासनाचे नियंत्रण राहणार आहे. तथापि IMC ला औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत २० टक्के प्रवेश देण्याचे अधिकार राहतील. याबाबतची कार्यपध्दती स्वतंत्ररित्या विहित करण्यात येईल. उर्वरित ८० टक्के विद्यार्थ्यांचे प्रवेश राज्य शासनाच्या प्रचलित नियमानुसार करण्यात येतील.

९. या योजनेअंतर्गत निवड करण्यात आलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची मालकी राज्य शासनाकडेच राहील.

१०. जागतिक बँक सहाय्यित प्रकल्पाच्या अंमलबजावणीवर नियंत्रण व मार्गदर्शन करण्यासाठी राज्य सुकाणू समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्याच समितीने या योजनेच्या सर्वसाधारण अंमलबजावणीवर नियंत्रण व मार्गदर्शन करावयाचे आहे. या संबंधित शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहे.

११. राज्य स्तरावर या योजनेची अंमलबजावणी व संनियंत्रण करण्याकरीता राज्य अंमलबजावणी कक्ष (स्टेट इम्लिपमेंटेशन सेल) स्थापन केला जाईल. याचे स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील. राज्य अंमलबजावणी कक्षाकडे योजनेचे व्यवस्थापन, संनियंत्रण व मुल्यमापन करण्यासाठी आवश्यक असणारी पदे शासन व संचालनालयस्तरावर निर्माण करण्यात येतील.

१२. केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या निधीच्या खर्चाचे व हिशोबाचे लेखे ठेवणे व त्याचे लेखापरीक्षण करुन घेणे, वार्षिक लेखा अहवाल तयार करणे याबाबतची जबाबदारी सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट नुसार संबंधित व्यवस्थापन समितीची राहिल.

१३. केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी संस्था व्यवस्थापन समितीने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा दर्जावाढ करण्यासाठी वापरावयाचा आहे. या योजनेतंर्गत सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना करता येईल, किंवा/आणि अधिक मागणीचे व्यवसाय सुरु करता येतील/अधिकच्या मागणीच्या तुकडया सुरु करता येतील/अधिक मागणीच्या सद्याच्या व्यवसायाचा दर्जावाढ/कमी मागणीचा व्यवसाय बंद करता येईल. त्यानुसार या योजनेअंतर्गत सुरु करण्यात येणा-या व्यवसायांमध्ये/व्यवसाय गटामध्ये प्रवेशाची कार्यवाही ऑगस्ट, २००८ पासून करण्यात यावी.

१४. संस्था व्यवस्थापन समिती औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत अल्प मुदतीचे अभ्यासक्रम सुरु करणे, उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना राबविणे, आवश्यक असलेल्या यंत्रसामुग्री व त्याचे परिरक्षण, त्यांचे व्यवस्थापन, शिक्षकांना प्रशिक्षण देणे, विद्यार्थ्यांना नोकरीविषयक सहाय्य करणे ही जबाबदारी पार पाडावयाची आहे.

१५. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प निदेशकांची मंजूर पदे रिक्त राहणार नाहीत, याची जबाबदारी संचालक (प्रशिक्षण) यांची राहील.

१६. संस्था विकास आराखडयानुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आयएमसीला नवीन व्यवसाय/तुकडी सुरु करावयाचे असल्यास आवश्यकतेनुसार करार तत्वावर शिक्षक (Contractual Faculties) पदे नेमता येतील. यासाठीचा खर्च या योजनेच्या उपलब्ध निधीतून भागविण्यात यावा. या योजनेअंतर्गत राज्यशासनाकडून कोणतीही आवर्ती /अनावर्ती तरतूद उपलब्ध होणार नाही.

१७. संबंधित औ.प्र.संस्थेतील अधिकारी व कर्मचारी वर्गावर पूर्वीप्रमाणेच राज्य शासनाचे प्रशासकीय नियंत्रण राहील. तसेच सद्य:स्थितीत वरील योजनेव्यतिरिक्त चालू असलेल्या नियमित अभ्यासक्रमांबाबतचा आवर्ती व अनावर्ती खर्च राज्य शासनाकडून करण्यात येईल.

सदर योजनेच्या अंमलबजावणीची आवश्यक ती सर्व कार्यवाही संचालक (प्रशिक्षण) यांनी सत्वर करावी.

सदर शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७२५/२००७/व्यय-५, दि.२९.१२.२००७ अन्वये दिलेल्या संमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय शासनाच्या संकेत स्थळावर www.maharashtra.gov.in यावर उपलब्ध असून त्याचा संगणकीय सांकेतांक क्र. २००७१२३११४३८४५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सीमा ढमढेरे )

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सचिव, श्रम व रोजगार मंत्रालय, श्रमशक्ती भवन, भारत सरकार, नवी दिल्ली

संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई / पुणे / नागपूर/ औरंगाबाद / अमरावती / नाशिक

जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (सर्व)

महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र मुंबई -१, नागपूर

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई-१, नागपूर

संबंधित प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था

रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई

नियोजन विभाग/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

कार्यासन अधिकारी (साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव

मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव

निवड नस्ती/व्यशि-२

**शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक आयटीआय-२००७/(१६२/०७)/व्यशि-२, दि.३१ डिसेंबर २००७ चे प्रपत्र.**

**केंद्रशासन पुरस्कृत योजनेअंतर्गत खाजगी सहभागाने (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपद्वारे) राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जावाढ करणे या योजनेत पहिल्या टप्प्यात समावेश करावयाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची यादी.**

| अ क्र | विभागाचे नाव | जिल्हयाचे नाव | अ क्र | औ प्र संस्थेचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | मुंबई उपनगर | १ | बोरीवली |
| | | ठाणे | २ | शहापूर |
| | | | ३ | बेलापूर |
| | | | ४ | मुरबाड |
| | | रायगड | ५ | उरण |
| | | रत्नागिरी | ६ | रत्नागिरी (मु) |
| | | सिंधुदुर्ग | ७ | फोंडाघाट |
| २ | नाशिक | नाशिक | ८ | नाशिक (मु) |
| | | | ९ | सिन्नर |
| | | | १० | चांदवड |
| | | | ११ | सटाणा |
| | | | १२ | निफाड |
| | | | १३ | येवला |
| | | नंदुरबार | १५ | अक्कलकुवा |
| | | जळगाव | १५ | पारोळा |
| | | | १६ | जामनेर |
| | | अहमदनगर | १७ | श्रीगोंदा |
| | | | १८ | नेवासा |
| | | | १९ | पाथर्डी |
| | | धुळे | २० | शिरपूर |
| ३ | पुणे | पुणे | २१ | औंध-पुणे (मु) |
| | | | २२ | दौंड (वरवंड) |
| | | | २३ | पुरंदर (सासवड) |
| | | | २४ | खेड |
| | | | २५ | शिरुर |
| | | सोलापूर | २६ | पंढरपूर |
| | | | २७ | मंगळवेढा |
| | | सांगली | २८ | विटा |
| | | सातारा | २९ | वाई |
| | | | ३० | दहिवडी (माण) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | औरंगाबाद | जालना | ३१ | अंबड |
| | | | ३२ | बदनापूर |
| | | | ३३ | भोकरदन |
| | | बीड | ३४ | आष्टी |
| | | | ३५ | परळी -वैजनाथ |
| | | हिंगोली | ३६ | बसमतनगर |
| | | नांदेड | ३७ | धर्माबाद |
| | | | ३८ | भोकर |
| | | उस्मानाबाद | ३९ | भूम |
| | | | ४० | कळंब |
| | | | ४१ | परांडा |
| | | लातूर | ४२ | लातूर (मु) |
| | | | ४३ | अहमदपूर |
| ५ | अमरावती | अमरावती | ४४ | अमरावती (मु) |
| | | | ४५ | मोर्शी |
| | | | ४६ | मोझरी |
| | | | ४७ | नांदगाव-खांडेश्वर |
| | | | ४८ | धारणी |
| | | यवतमाळ | ४९ | गुंज (महागाव) |
| | | | ५० | पुसद |
| | | | ५१ | उमरखेड |
| | | अकोला | ५२ | अकोला (मु) |
| | | वाशिम | ५३ | मंगळुरपीर |
| ६ | नागपूर | नागपूर | ५४ | सावनेर |
| | | गोंदिया | ५५ | देवरी |
| | | | ५६ | सालेकसा |
| | | | ५७ | तिरोडा |
| | | भंडारा | ५८ | भंडारा (मु) |
| | | | ५९ | तुमसर |
| | | | ६० | साकोली |
| | | चंद्रपूर | ६१ | वरोरा |
| | | | ६२ | ब्रम्हपूरी |
| | | | ६३ | सिंदेवाही |
| | | गडचिरोली | ६४ | सिरोंचा |
| | | | ६५ | देसाईगंज |